




Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com








वर्ष ३ रे | अंक : ७७५. वा | शनिवार दि. १८ मे २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# परवानगी नसतानाही एसीच्या हवेने सरकारी अधिकारी चिल!

**वृत्तसंस्था/संभाजीनगर**

एकीकडे हलकासा पाऊस झाला, थोडे वारा वादळ आले तरी विजेचे संकट शहरात निर्माण होते. उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात विजेचा वापर होत असल्याने काही भागात वीज कपात देखील केली जात आहे. औद्योगिक क्षेत्रात वीजेअभावी उद्योजकांना झळ सोसावी लागत आहे. ग्रामीण भागात तर एकदा गूल झालेली विज कधी परत येईल, याची शाश्वती नसते. वीजेअभावी शेतकऱ्यांना पिकांना पाणी देता येत नाही. याशिवाय ग्रामीण भागात तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. दुसरीकडे अधिकाऱ्यांना वीजेचे हे संकट सामान्य वाटत आहे. बहुतांश अधिकाऱ्यांच्या कार्यालयांत राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाच्या मुख्य सचिवांचा आदेश पायदळी तुडवत दिवसाढवळ्या एसी सुरू असतो. प्रत्यक्षात मुख्य सचिवांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील कुठल्याही अधिकाऱ्याला एयर कंडीशन यंत्रणा बसविण्याची परवानगी नाही, असे असताना शहरातील बड्या बड्या अधिकाऱ्यांनी पदाचा दुरुपयोग करत आपापल्या कार्यालयात एयर कंडीशन यंत्रणा बसविली आहे. परिणामी राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाच्या मुख्य सचिवांचे आदेश कागदावरच राहिले आहेत. जिल्ह्यातील वेगवेगळ्या सरकारी कार्यालयात येणाऱ्या सामान्य जनतेला धड छतावरच्या पंख्याची सुविधा नाही. अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी सामान्य जनतेला लाइनीत काही तास उभे राहावे लागते. या संदर्भात सामान्य जनतेशी संवाद साधला असता बड्या अधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यालयात एअर कंडिशनची हवा खात आहेत. मात्र आम आदमीसाठी छतावरचे पंखे तर सोडाच साधी पाण्याची आणि स्वच्छतागृहांची देखील सोय नसल्यामुळे जीवाचे हाल होत असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील सरकारी कार्यालयात एअर कंडीशन लावल्याने वीजेचे बिल दुप्पट वाढत आहे. यात जनतेच्या कष्टाच्या घामाच्या कोट्यवधी रुपयांना चुना लावला जात आहे. यासंदर्भात महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला असता, त्यांनी सांगितले की, की ज्या कार्यालयात मीटर लावलेले आहेत, त्यांनी जितकी वीज वापरली तितके बील आम्ही वसुल करतो. मीटरचा लोड




कमी जास्त झाला तरी आम्हाला त्याचा काही फरक पडत नाही. जेवढी वीज खर्च केली गेली, तितके बिल आम्ही संबंधित ग्राहकाकडून वसुल करतो. यासंदर्भात अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारावर शहरातील किरण काळे यांनी थेट विभागीय आयुक्तांकडे रितसर तक्रार दाखल केली आहे. आता विभागीय आयुक्त चुकीच्या पद्धतीने लावले गेलेले एसी उतरवतात की जनतेच्या पैशाला चूना लावणारा हा अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार असाच चालू ठेवतात.

---

## मुलांच्या पाठीवरील दप्तरांच्या ओझ्याचा भार कधी होणार कमी?

**जनसंचलन/बुलढाणा**

शाळा सुरू होणार असल्याने प्रशासकीय पातळीवर पुस्तके, शालेय गणवेश याबाबतचे नियोजन आताच सुरू आहे. शासन दप्तरांचे ओझे कमी करण्यासाठी प्रयत्नशील असले, तरी प्रत्यक्षात त्याच्या अंमलबजावणीला म्हणावे तसे यश येताना अपवादानेच दिसून येत आहे. त्यामुळे मुलांच्या पाठीवरील दप्तराच्या ओझ्याचा भार कमी होईल का, असा प्रश्न पालकांना पडला आहे.शिक्षण विभागाने दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या आहेत. त्यामध्ये वही आणि पुस्तक वेगवेगळ्या बाळगण्यापेक्षा पुस्तकालाच वह्यांची पाने जोडण्याचा प्रस्ताव समोर आला. या पार्श्वभूमीवर शिक्षणतज्ज्ञ व पालकांमधून मागवण्यात होत्या. सूचना आल्या त्यानुसार बालभारतीच्या महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडून अंमलबजावणी झाली आहे. सर्व सरकारी खासगी व अनुदानित शाळांमध्ये इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या मोफत पाठ्यपुस्तकांना प्रत्येक घटकानंतर वह्यांची पाने लावण्यात आली.मात्र, खासगी विनाअनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये त्यांनी निवडलेला अभ्यासक्रम असतो. त्यामध्ये ही पद्धत दिसून येत नाही. परिणामी खासगी विनाअनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना एकाच विषयाच्या दोन-तीन पुस्तिका व सोबतच



वह्या बाळगाव्या लागतात. यावर उपाय योजना करण्यची गरज आहे. एकापेक्षा अधिक पेन, पेन्सिल व इतर शालेय साहित्य, एकाच विषयाला एकापेक्षा जादा वह्या, प्रॅक्टिकलचे साहित्य, चित्रकला, कार्यानुभव व प्रोजेक्टचे साहित्य. पाठ्यपुस्तकात कोरी पाने जोडून दप्तराचे ओझे कमी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, विद्यार्थ्यांचे ओझे कमी झाले का, याची पाहणी होत नाही.

## वाघजाळ फाट्यानजीक शॉक लागून विद्युत सहाय्यकाचा मृत्यू

**जनसंचलन/मोताळा**

विद्युत खांबावर कृषी क्षेत्राचा वीज पुरवठा सुरळीत करणाऱ्या विद्युत सहायकाचा शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना दि. १७ मे रोजी सकाळी ८ वाजताच्या सुमारास वाघजाळ फाट्यानजीक घडली. गुणवंत सांगवे (रा. लिहा) असे मृतकाचे नाव आहे. विद्युत वितरण विभागामध्ये मोताळा भाग दोनमध्ये ते विद्युत सहायक म्हणून कार्यरत आहे. सुसाट वाऱ्यामुळे टाकळी परिसरातील कृषी क्षेत्रातील वीज पुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे गुणवंत सांगवे हे सहकाऱ्यांसह दि. १७ मे रोजी विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी गेले होते. यासाठी त्यांचे वरिष्ठ तंत्रज्ञ यांनी परवानगी घेऊन त्या भागातील विद्युत पुरवठा



बंद केला असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान सकाळी आठ वाजेच्या सुमारास वाघजाळ फाट्याजवळील विद्युत खांबावर विद्युत पुरवठा सुरळीत करण्याचे काम करीता असताना गुणवंत सांगवे यांना शॉक लागून ते खाली पडले. तातडीने त्यांना बुलढाणा येथे उपचारासाठी हलविण्यात आले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. घटनास्थळी विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता आर. तायडे यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांनी भेट देऊन पहाणी केली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मलकापूर पांग्रा येथील बैलबाजारात आली तेजी

जनसंचलन/मलकापूर पांग्रा

विदर्भासह राज्यात प्रसिद्ध असलेल्या मलकापूर पांग्रा येथील बैलांच्या बाजारात गेल्या आठवड्यापर्यंत काहीशी मंदी होती. परंतु आता मान्सूनपूर्व पावसाचे लागलेले वेध पाहता शेतीमशागतीची शेतकऱ्यांची लगबग सुरू झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर जवळपास १०० वर्षांचा इतिहास असलेल्या मलकापूर पांग्रा येथील बैलबाजारात बैल खरेदी- विक्रीचे व्यवहार वाढल्याचे गुरुवारी दिसून आले. गुरुवारी भरणाऱ्या या बाजारात मोठ्या प्रमाणावर गुरे विक्रीसाठी आली होती. विदर्भ, मराठवाड्यासह बुलढाणा जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर बैल येथे विक्रीसाठी आणण्यात आले होते. मलकापूर पांग्रा येथील बाजारात बैलांच्या खरेदी-विक्रीची तगडी उलाढाल होते. शेतीमशागतीसाठी बैलाचा वापर कमी होत असल्याचे सांगण्यात येत असले तरी वाढती महागाई व इंधनाचे दर पाहता पारंपरिक पद्धतीने बैलाद्वारे शेतीमशागतीची कामे करण्याकडे शेतकऱ्यांचा कल दिसून येत आहे. गेल्या आठवड्यात येथील बाजारात अल्प प्रमाणात बैल विक्रीसाठी आले होते. परंतु १६ मेरोजी मोठ्या संख्येने व्यापारी व खरेदीदार आठवडी बाजारात आल्याचे दिसून आले. ७० हजार ते दीड लाखापर्यंत किंमत मलकापूर पांग्रा येथील बैलबाजारात सध्या गावरान व मध्यम उंचीच्या गोऱ्यांच्या जोडीची किंमत ७० हजार ते




दीड लाख रुपयाच्या आसपास गुरुवारी दिसून आली. मोठे शेतकरी या जातीच्या बैलजोडी खरेदीला पसंती देतात. मध्यम उंचीचे बैल ज्यांना गोऱ्हे (गोन्हे) म्हणून संबोधतात. बुलढाणा जिल्ह्यासह जालना, अकोला, वाशिम या भागांतून शेतकरी व व्यापारी येथे बैल खरेदीसाठी आले होते. परिसरातील प्रसिद्ध असा हा बैलबाजार आहे.

# ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

जनसंचलन/ खामगाव




भरधाव ट्रकच्या धडकेत एक ३४ वर्षीय दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. ही घटना ३ मे रोजी रात्री उशिरा टेंभुर्णा फाट्यावर घडली. याप्रकरणी तक्रारीवरून अज्ञात ट्रक चालकाविरोधात बुधवारी सायंकाळी गुन्हा दाखल केला. याबाबत धनराज विश्वनाथ वाशिमकर (७०, रा. हनुमान मंदिर, सतीफैल) यांनी खामगाव ग्रामीण पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिली की, त्यांचा मुलगा प्रशांत हा एमएच २८ एजी १२३९ या क्रमांकांच्या दुचाकीने अकोला येथून खामगावकडे ३ मे रोजी परत येत होता. दरम्यान, अज्ञात ट्रकचालकाने त्याला कट मारला. त्यामुळे झालेल्या अपघातात प्रशांत गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर अकोला येथे उपचार सुरू असल्याचे म्हटले. या तक्रारीवरून खामगाव ग्रामीण पोलिसांनी अज्ञात ट्रक चालकाविरोधात भादंवि कलम २७९, ३३७, ४२७ सहकलम १३४ / १७७ मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल केला. पुढील तपास खामगाव ग्रामीण पोलिस करीत आहेत.

# जुन्या भांडणावरून त्याने दिली जीवे मारण्याची धमकी

जनसंचलन/खामगाव



जुन्या भांडणाच्या कारणावरून एकास अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. ही घटना खामगाव तालुक्यातील देऊळखेड शहापूर येथे दुपारी घडली. तक्रारीनुसार, पुरुषोत्तम लहुजी तायडे (५०) हे बुधवारी दुपारी देऊळखेड शहापूर येथील महापुरुषाच्या पुतळ्याजवळ बसले होते. त्यावेळी संशयित गौतम डिंगाबर तिडके (३५, रा. शहापूर) हा तिथे आला. १२ मे रोजी झालेल्या भांडणाचे कारण उकरून काढत, हातात काठी घेऊन तो पुरुषोत्तम लहुजी तायडे यांच्या अंगावर धाऊन गेला. सोबतच शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला. या तक्रारीवरून खामगाव ग्रामीण पोलिसांनी संशयिताविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास खामगाव ग्रामीण पोलिस करत आहे. जुन्या वादाची यास किनार आहे.

# कोथळीत आले ते तिघं बकऱ्या चोरण्यासाठी मात्र नागरिकांनी त्यांना जाम बदाडले

जनसंचलन/मोताळा

बकऱ्या चोरणाऱ्या तीन जणांना १६ मे रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास कोथळी येथे नागरिकांनी पकडले. यावेळी तिघांना संतप्त नागरिकांनी चोप देत बकऱ्या घेऊन जाणाऱ्या कारची तोडफोड केली. त्यानंतर चोरट्यांना बोराखेडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. याप्रकरणी फिर्यादीवरून बोराखेडी पोलिसात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील कोथळी येथे १६ मे रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास खामगाव तालुक्यातील चितोडा येथील सुरज आनंदा हिवराळे, आशिष रवींद्र वानखेडे, रविकांत जनार्दन हिवराळे हे तीन चोरटे स्विफ्ट डिझायर कारमधून बकऱ्या चोरी करण्यासाठी आले होते. यावेळी त्यांनी कोथळी येथील शे. जावेद शे. रशीद यांची बकरी चोरी करून स्विफ्ट डिझायर कारमध्ये घेऊन जाताना चिंतामणी मंदिराजवळ नागरिकांनी पाहिले. तेव्हा त्यांना थांबवून संतप्त नागरिकांनी चोप देत चोरीची बकरी घेऊन जाणाऱ्या कारची तोडफोड केली. बकरी मालक शे. जावेद यांना फोनवरून माहितीही देण्यात आली. बकरी मालक यांनी त्याठिकाणी जाऊन पाहिले असता त्या कारमधील बकरी ही त्यांची दिसून आली. सदर माहिती बोराखेडी पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठून तिघांना वाहनासह ताब्यात घेत पोलिस ठाण्यात आणले. याप्रकरणी




कोथळी येथील शे. जावेद शे. रशीद यांनी बोराखेडी पोलिसात दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी सुरज हिवराळे, आशिष वानखेडे आणी रविकांत हिवराळे या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सहायक पोलिस उपनिरीक्षक यशवंत तायडे आणि पोलिस कॉन्स्टेबल सुनील भवटे हे करीत आहेत. दोन दिवसापूर्वी बुलढाणा शहरातूनही ८ बकऱ्या एका चार चाकी वाहनाद्वारे चोरून नेण्यात आल्या होत्या.

# पतीच्या मृत्यूप्रकरणी पत्नीसह साला व त्याच्या मित्रावर गुन्हा दाखल

जनसंचलन/शेगाव

गेल्या आठ दिवसांपूर्वी मारहाण प्रकरणात ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. याप्रकरणी पत्नीला माहीत असतानाही तिने नवऱ्याच्या खुनाची माहिती न दिल्याने पत्नीसह इतर दोघांविरुद्ध शेगाव शहर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी आरोपींना अटकही करण्यात आली आहे. याप्रकरणी संप्रदाय नगर (रोकडिया नगर) परिसरातील रहिवासी लक्ष्मण वासुदेव मानकर यांना जखमी अवस्थेत शेगात येथील सर्वबाई मोटे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यावेळी त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. रुग्णालयात माहिती देताना मृतकाची पत्नी नलिनी लक्ष्मण मानकर (५०) हिने गाडीवरून पडल्याने जखमी झाल्याची माहिती दिली होती. त्यानंतर शवविच्छेदन अहवाल आणि पोलिसांनी केलेल्या तपासात मृतकाला मारहाण केल्याचे पुढे आले. त्यानुसार मृतक लक्ष्मण हा पत्नी नलिनीला शारीरिक व मानसिक त्रास देत होता. त्याचा जाब विचारण्यासाठी आलेला पत्नीचा भाऊ सुटाळा बु. येथील गोपाल ऊर्फ नारायण उकर्डा वाघ (५०) हा त्याचा मित्र आतार येथील बाळकृष्ण रामकृष्ण वांडे (५५) याच्यासह आला. त्यावेळी त्यांनी मृतकाला काठीने हातापायावर डोक्यावर मारून जबर जखमी केले. तसेच उपचारासाठी केले. दरम्यान, लक्ष्मण मानकरचा मृत्यू झाला. याप्रकरणी मृतकाची पत्नी नलिनी हिने रुग्णालयात खोटी माहिती दिली. तसेच दोन्ही आरोपींना सहकार्य केले. यावरून पोलिसांनी तीनही आरोपीविरुद्ध भादंविच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोनि हेमंत ठाकरे यांच्या आदेशाने सहाय्यक पोलिस निरिक्षक आयरे करीत आहेत




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# बुलढाण्यात कृषि विज्ञान केंद्राच्या वतीने भव्य आंबा महोत्सवाचे आयोजन..

## आंबा महोत्सवाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद..






जनसंचलन/बुलढाणा

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अंतर्गत असलेल्या बुलढाण्याच्या कृषि विज्ञान केंद्र येथे जिल्ह्यातील शेतकरी तसेच आंबा प्रेमींसाठी आज एकदिवसीय भव्य आंबा महोत्सव,आंबा प्रदर्शनी व विक्रीचे आयोजन करण्यात आलेय ..शेतकऱ्यांना आपल्या शेतात आंबा लागवडीला वाव मिळावा तसेच आंब्याच्या प्रजातींना ओळख मिळावी, या उद्देशाने हा आंबा महोत्सव आणि प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते..या महोत्सवामध्ये केशर, पायरी,लंगडा,निलंम,राजपुरी,मल्लिका,रत्ना, तोतापुरी, हापूस,दसेरी,आम्रपाली व गावरान यासह अन्य प्रजातीचे १७ आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला, प्रदर्शनी मध्ये उपस्थित झालेल्या शेतकरी आणि नागरिकांनी या विविध प्रजातीच्या आंब्याची माहिती व चव घेतली यावेळी अनेकांनी तर त्यांच्या पसंतीचे आंबे देखील खरेदी केलेय.. या आंबा महोत्सवाध्ये शेतकरी व नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिलाय.. आंबा महोत्सवाचे उद्घाटन बुलढाणा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केलेय तर अध्यक्षस्थानी पंजाबराव कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.शरद गडाख हे होते..

# घरासमोर उभी असलेले कार अज्ञात चोरट्याने केली लंपास

जनसंचलन/ सिंदखेडराजा



नेहमीप्रमाणे घरासमोर उभी असलेले कार अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना १६ मे २०२४ ते १७ मे २०२४ दरम्यान घडली आहे. सविस्तर वृत्त असे की तक्रार करते किशोर लक्ष्मण वाघमारे वय ४८ रा नाव्हा टी पॉईंट ता. सिंदखेड राजा यांनी दिलेल्या तक्रारीनुसार सन २०१४ मध्ये मारुती सुझुकी कंपनीची स्विफ्ट डिझायर पांढरा रंगाची का क्रमांक एम एच २८ वी ८८०४ अशी नवीन कार घेतली होती त्यापासून आजपर्यंत ही कार माझ्या ताब्यात होती. दिनांक १६ मे २०२४ रोजी रात्री दहा वाजे दरम्यान कार दररोज प्रमाणे घरासमोर पार्किंग करून ठेवली होती लग्नाचा वाढदिवस असल्या कारणाने घरी कार्यक्रम असल्याने सर्वजण जागीच होते.रात्री ३:३० वाजेच्या दरम्यान बाहेर येऊन गाडी पाहून घराच्या समोरील गच्चीवर सर्वजण झोपले होते सकाळी सहा वाजे दरम्यान बाहेर येऊन पाहणी केली असता घरासमोर पार्क केलेली स्विफ्ट डिझायर पांढऱ्या रंगाची कार अंदाजे किंमत ३ ,७५,००० रुपयांची कार अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. पोलिसांनी दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सदर घटनेचा पुढील तपास सिंदखेडराजा पोलीस करीत आहे

# विकास सुखधाने यांना २०२४ चा राज्यस्तरीय बहुजनरत्न जीवन गौरव पुरस्कार जाहीर

जनसंचलन/चिखली



ऋणानुबंध समाज विकास संस्था चिखली द्वारा संचलित तुकाराम आश्रय वृद्धाश्रम भोकर ता. चिखली जि. बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा मान सन्मान आणि कर्तुत्वाचा २०२४ या वर्षीचा ङ्कबहुजनरत्न जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार हा मेहकर तालुक्यातील नांद्रा वरदडी येथील सुप्रसिध्द आदर्श युवा साहित्यिक लेखक कवी विकास सुखधाने यांना जाहीर झाला आहे.आपल्या वास्तववादी साहित्य लेखणीतून विकास सुखधाने यांनी शोषित, वंचित, पिडीत ,शेतकरी कष्टकरी कामगार ,गोर ,गरीब मजूर यांच्या व्यंथांना वाचा फोडली आहे.सन्मान नेतृत्वाचा राज्यस्तरीय बहुजन रत्न सन्मान सोहळा २०२४ बहुजन महापुरुषांच्या विचारावर विविध क्षेत्रांत उल्लेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्तिंना सदर पुरस्कार दिल्या जातो,बहुजन चळवळीत आत्मविश्वासाने आणि जिद्दीने आपले ध्येय साध्य करीत आलेल्या,आपल्या कार्यक्षेत्रामध्ये खंबीरपणे उत्तुंग कामगिरी करुन बहुजन समाजाच्या कल्याणासाठी सतत धडपड करत असणाऱ्या संघर्षातून मोठे यश मिळवणाऱ्या व्यक्तींची बहुजन रत्न जिवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड केली जाते, विकास सुखधाने यांनी समाज आणि साहित्य कार्यक्षेत्रामध्ये खंबिरपणे उत्तुंग कामगिरी केली असता . त्यांची बहुजन समाजाचे कल्याणासाठी सतत लेखणीतून धडपड चालू आहे.संघर्षातून मिळालेल्या याच दैदिप्यमान यशा बद्दल निवड समितीने साहित्यिक लेखक कवी विकास सुखधाने यांची राज्यस्तरीयफ्क बहुजन रत्न जीवन गौरव ,, पुरस्कारासाठी त्यांची निवड केली आहे.सदर पुरस्कार हा त्यांना राज्यातील लोकप्रतिनिधी, जेष्ठ पत्रकार, शासकिय,अधिकारी व जेष्ठ सामाजिक नेते यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. ३१ मे २०२४ रोजी दुपारी २ वाजता पंचशील बुद्ध विहार गजानन नगर चिखली येथे मान सन्मानाने प्रदान करण्यात येणार असल्याचे.आयोजक मा.प्रशांत भैया डोंगरदिवे संस्था अध्यक्ष सौ.लता अविनाश डोंगरदिवे यांनी निवडपत्रा द्वारे कळवले आहे.

# नवऱ्याने केली बायकोला बेदम मारहाण

## उपचारादरम्यान बायकोचा मृत्यू देऊळघाट येथील धक्कादायक घटना

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा तालुक्यातील देऊळघाट येथून अतिशय खळबळ जनक धक्कादायक घटना समोर आली आहे. नवऱ्याने पत्नीला मारहाण केल्यामुळे दवाखान्यात भरती असलेल्या महिलेचा मृत्यू झाला याप्रकरणी मृत महिलांच्या भावाने बुलढाणा ग्रामीण पोलिसात तक्रार दिली त्यावरून मोसिन खान मोबीन खान रा. देऊळघाट याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सविस्तर वृत्त असे की पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार अक्सा परवीन असे मृत महिलेचे नाव आहे त्यांचे भाऊ शेख समीर शेख खाजा यांनी बुलढाणा ग्रामीण पोलिसात तक्रार दिले त्यानुसार बारा वर्षांपूर्वी त्यांची बहीण अक्सा परवीन यांचा विवाह देऊळघाट येथील मोसिन खान मोबीन खान यांच्याशी झाला होता तो नेहमी किरको कारणावरून घरी वाद करायचा आणि पत्नी अक्सा परवीन यांना मारझोड करायचा १३ मे रोजी दुपारी शेख समीर यांना आरोपी मोसिन खान यांचा फोन आला. त्यावेळी त्यांनी सांगितले की बहीण अक्सा परवीन हिला बुलढाण्यातील मल्टी स्पेशलिस्ट दवाखान्यात भरती केले आहे त्यानंतर शेख समीर यांनी हॉस्पिटल गाठून बहिणीची विचारपूस केली तेव्हा किरकोळ कारणावरून वाद होऊन मारहाण झाली चापट बुक्यांनी पोटात मारहाण झाल्याने पोटात दुखत आहे. पोटाच्या आत गंभीर स्वरूपाची दुखापत झाल्याचे त्यांना बहीण अक्सा परवीन यांनी सांगितले दरम्यान काल सकाळी १०:३० वाजेच्या सुमारास उपचार सुरू असतानाच अक्सा परवीन यांचे निधन झाले तत्पूर्वी आरोपी मोसिन खान याने सांगितले होते की जर तुम्ही तक्रार दिली तर मी तुझ्या बहिणीला वागवणार नाही व तिला जीवनी मारून टाकीन असे तक्रारीत म्हटले आहे. दरम्यान अंत्यविधी झाल्यानंतर मृतक महिलेचा भाऊ शेख समीर यांनी तक्रार दिली प्राप्त तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी मोसिन खान याच्याविरुद्ध काल रात्री उशिरा पुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे

# अवैध दारू विक्रेत्यावर खामगाव ग्रामीण पोलिसांनी केली कारवाई

जनसंचलन/ खामगाव

: अवैध दारूविक्री करताना आढळून आल्याने एकावर कारवाई करण्यात आली. ही घटना खामगाव तालुक्यातील शहापूर येथे बुधवारी सायंकाळी घडली. प्राप्त माहितीनुसार, सचिन हर्षवर्धन तिडके (३०) हा हातभट्टीची दारू विक्रीच्या उद्देशाने बाळगताना आढळून आला. त्याच्या जवळून ८५० रुपये किमतीची ८ लीटर दारू जप्त करण्यात आली. याप्रकरणी पोकॉ देवानंद चांदणे यांनी ग्रामीण पोलिस स्टेशनला दिलेल्या तक्रारीवरून उपरोक्त संशयिताविरोधात महाराष्ट्र




दारूबंदी कायदा कलम ६५ ई नुसार कारवाई करण्यात आली.

# तीव्र चक्रीवादळ धडकणार महाराष्ट्रासह या राज्यांना आयएमडीचा इशारा!

**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्यात अवकाळी पावसाने थैमान घातले असताना, आता २३ ते २७ मे दरम्यान देशातील काही राज्यांमध्ये एक चक्रीवादळ धडकण्याचा धोका निर्माण झाला आहे. प्रामुख्याने बंगालच्या उपसागरामध्ये कमी दाबाचा पट्टा निर्माण होऊन, त्याचे रुपांतर चक्रीवादळात होण्याची शक्यता आहे. या चक्रीवादळाचा सर्वाधिक प्रभाव ओडिशा, महाराष्ट्र, गुजरात या राज्यांमध्ये दिसून येणार आहे. हे चक्रीवादळ पश्चिमेकडे सरकण्यापूर्वी पूर्वेकडील किनारपट्टीवर धडकेल, ज्यामुळे देशाच्या विस्तृत भागावर ( ) परिणाम होईल. असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाकडून (आयएमडी) व्यक्त करण्यात आला आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या तुफान अवकाळी पाऊस ( ) पडत आहे. वादळी वाऱ्यासह पडत असलेल्या या पावसामुळे अनेक भागांमध्ये शेतपिकांचे आणि घरांचे मोठे नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला गेल्यामुळे बळीराजा हवालदिल झाला आहे. अशामध्ये आता राज्यात आज देखील अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस आणि गारपिट होण्याची शक्यता हवामान असल्याचे हवामान विभागाने आपल्या अंदाजात म्हटले आहे. आज सोलापूर, कोल्हापूर, जालना, सिंधुदुर्ग, बुलडाणा, धाराशिव, लातूर, हिंगोली, अकोला, अमरावती, वाशीम, अहमदनगर, सांगली, बीड, नांदेड, परभणी या जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता असून, या ठिकाणी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आला आहे. वादळी वाऱ्यासह हा पाऊस पडणार असल्यामुळे नागरिकांनी घराबाहेर पडताना तसेच शेतकऱ्यांनी शेतामध्ये काम करत असताना काळजी घ्यावी, असे आवाहन हवामान खात्याकडून करण्यात आले आहे. दरम्यान, मागील २४ तासांमध्ये जळगाव येथे उच्चांकी ४२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. विदर्भ, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पारा ४० अंशांच्या वर आहे. तर ढगाळ वातावरणामुळे उन्हाचा चटका कमी झाला असून, कमाल तापमानात चढ-उतार होत आहे. अरबी समद्रात



येमेनच्या किनाऱ्यालगत समुद्र सपाटीपासून ४.५ किलोमीटर उंचीपर्यंत चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. मध्य प्रदेश आणि परिसरावर ९०० मीटर उंचीवर चक्राकार वाऱ्याची स्थिती आहे. ज्यामुळे सध्या राज्यात अवकाळी पावसाचे वातावरण कायम आहे.

# पोलिस निरीक्षकाच्या घरी सापडले मोठं घबाड!

**वृत्तसंस्था/संभाजीनगर**

लाच मागितल्याचा आरोप असलेल्या बीड येथील एका पोलिस निरीक्षकाच्या घरावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी धाड टाकली. यात पोलिसांना १ कोटी ८ लाख रुपयांची रोकड तसेच ७२ लाख रुपयांची सोन्याची बिस्किटे व दागिणे सापडले. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बीड येथे राहणारा पोलिस निरीक्षक हरिभाऊ खाडे आणि त्याच्याशी संबंधित इतर दोघांवर एका व्यक्तीला १ कोटी रुपयांची लाच मागितल्याचा आरोप होता. १५ मे पासून हरिभाऊ खाडे फरार होता. पोलिसात गुन्हा दाखल न करण्यासाठी त्याने एका आरोपीकडून एक कोटी रुपयांची लाच मागितली होती. मात्र, नंतर हा सौदा ३० लाख रुपयांवर पक्का झाला. ठरलेल्या रकमेपैकी ५ लाख रुपयांचा पहिला हप्ता स्वीकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकार्यांनी हरिभाऊ खाडे याच्याशी संबंधित कुशक जैन नावाच्या व्यक्तीला ताब्यात घेतले. वॉरंट मिळताच पोलिसांनी गुरुवारी हरिभाऊ खाडे याच्या बीड शहरातील चाणक्यपुरी भागातील घराची झडती





घेतली. यात त्यांना १.०८ कोटी रुपयांची रोकड, ७२ लाख रुपयांचे ९७० ग्रॅम सोन्याची बिस्किटे आणि दागिणे आणि साडेपाच किलो चांदी सापडली. तसेच पोलिसांना हरिभाऊ खाडेच्या घरातून त्याच्या नावावरील ४ फ्लॅट आणि एका व्यावसायिक दुकानाची कागदपत्रे सापडली आहेत.

# फायनान्स कंपनीच्या कर्मचारी कर्ज वसुलीसाठी आला असता महिलेला अश्लील भाषेत केली शिवीगाळ

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

कर्ज वसुलीसाठी आलेल्या एका खाजगी कंपनीच्या कर्मचाऱ्याने महिलेला अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याची घटना सिंदखेडराजा येथे घडली आहे सविस्तर वृत्त असे की सिंदखेडराजा येथील एका महिलेने एस. फायनान्स कंपनीकडून कर्ज काढले होते दरम्यान १४ मे रोजी कंपनीचा कर्मचारी अमोल गोलाम हा हप्ता घेण्यासाठी आला. त्यावेळी त्यांनी सांगितले की, आज माझ्याकडे पैसे नाही मी नंतर देते परंतु अमोल याने सदर महिलेला अश्लील भाषेत बोलायला सुरुवात केली. शिवीगाळ केली तसेच





घरातील सामान सुद्धा बाहेर फेकण्याची धमकीही दिली असे तक्रारीत म्हटले आहे पोलिसांनी प्राप्त तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे पुढील तपास सिंदखेडराजा पोलीस करीत आहे

# समृद्धीवर अपघात,ट्रक चालकासह दोघे जखमी...





**जनसंचलन/दुसरबीड**

समृद्धी महामार्गावर नागपूर कॉरिडॉरवर हिवरखेड शिवारात ट्रकने समोरील वाहनाला धडक दिल्याने झालेल्या अपघातामध्ये ट्रकमधील दोघे जण जखमी झाले आहेत. हा अपघात १६ मे रोजी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास घडला. समृद्धीवर चॅनेल क्रमांक ३२५.१ वर नागपूर कॉरिडॉरमध्ये हा अपघात घडला. ठाणे येथील एका कंपनीचे साईन बोर्ड घेऊन अंबिकापूरकडे एमएच-०४-एलई-८००३ क्रमांकाचा ट्रक जात होता. दरम्यान ट्रक चालक राजकुमार यादव (रा. उत्तर प्रदेश (ह. मु. ठाणे) याला डुलकी लागल्याने त्याच्या ताब्यातील ट्रकसमोरील वाहनावर धडकला. यामध्ये आयशरचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून त्यामधील संबंधित कंपनीचा बोर्ड फिटिंग करणारा व्यक्ती वसीम कुरेशी (२५, रा. मुंबई) आणि वाहन चालक राजकुमार यादव हे दोघे जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच मदत कार्य करणारे पथक व महामार्ग पोलिस घटनास्थळी दाखल झाले. रुग्णवाहिकेमधील डॉक्टर वैभव बोराडे यांनी जखमींवर तत्काळ उपचार केले. क्यूआरव्ही पथकाचे हनुमान जायभाये आणि महामार्ग पोलिस विभागातील पोलिस उपनिरीक्षक गजानन उज्जैनकर, पोलिस हेडकॉन्स्टेबल विठ्ठल काळुसे, दानिश देशमुख व अमोल जाधव यांनी क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त वाहन बाजूला केले आणि महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली. ट्रकने ज्या दुसऱ्या वाहनाला पाठीमागून धडक दिली ते वाहन कोणते होते हे स्पष्ट झालेले नाही.